Rayat Shikshan Sanstha's

Estd.: 1965

(Maharashtra)

# DAHIWADI COLLEGE DAHIWADI

# DCD TIMES



Affiliated to Shivaji University, Kolhapur

Phone : 02165 - 220231 Fax : 02165 - 220231

Email : dcdprincipal@gmail.com

NAAC Third Cycle Reaccreditation : 'A' Grade with CGPA 3.25

NEWSLETTER

Dec. TO Feb. 2019

VOLUME 2, ISSUE 3

For Private Circulation Only

**Chief Editor Publisher : Principal, Dr. B.T.Jadhav** **Supported by : IQAC**

## प्राचार्यांचे मनोगत

विद्यार्थ्यांच्या बौध्दिक व व्यक्तिमत्व विकासासाठी द्वितीय सत्रामध्ये महाविद्यालयाच्या विविध विभाग व समित्यामार्फत अनेक एकदिवसीय कार्यशाळा, मार्गदर्शक व्याख्याने, उपक्रम, शिबिरे, व स्पर्धांचे आयोजन सुरेख व यशस्वीपणे करण्यात आले यातून जिल्हास्तरीय, विद्यापीठस्तरीय व राज्यस्तरीय मार्गदर्शकांचे मार्गदर्शन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लाभले.

विविध क्रीडा स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला, यात त्यांनी साजेसी व अपेक्षित कामगिरी करत यश मिळविले. विविध शिबिरातील विद्यार्थी सहभाग उल्लेखनीय आहे. महाविद्यालयीन अभ्यासक्रमासोबत विद्यार्थ्यांच्या विविधांगी कौशल्यासाठीचे महाविद्यालयनिर्मित लघुकालीन अभ्यासक्रमाचे अध्यापन करण्यात आले. यामध्ये ही विद्यार्थ्यांनी उत्तम गुण प्राप्त केले. या सर्व प्रकारच्या प्रतिसादासाठी विद्यार्थ्यांचे अभिनंदन. सर्व विभाग व समित्यांचे कार्य कौतुकास्पद आहे, सर्वांचे अभिनंदन !

– प्राचार्य डॉ. बी.टी.जाधव

## संपादकीय

शैक्षणिक अभ्यास हा शिक्षणाचा अनिवार्य भाग. याबरोबरच विद्यार्थ्यांचा व्यक्तित्व व व्यक्तिमत्व विकास होणे म्हणजे खरे शिक्षण. त्यासाठी महाविद्यालयामार्फत रोजगार कौशल्याची प्रात्यक्षिके, विविध स्पर्धा, व्याकरण मार्गदर्शनासारखे पूरक उपक्रम, व्यापक अनुभवासाठी व विविध ठिकाणांच्या माहितीसाठी भेटी, सहली असे विविध आयोजन डिसेंबर ते फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले. यातून विद्यार्थ्यांना निश्चितच लाभ झाला. विद्यार्थी, सर्व सहकारी व मा. प्राचार्यांचे हार्दिक आभार. धन्यवाद !

– डॉ. के.एम.पवार

## वाणिज्य विभाग



'ग्राहक जागरूकता व वित्तीय साक्षरता' कार्यशाळा उद्घाटक – मार्गदर्शक ॲड. जाधव एस. एस.

२९/१२/२०१८ रोजी एक दिवसीय कार्यशाळा 'ग्राहक जागरूकता व वित्तीय साक्षरता' संपन्न झाली. मा. ॲड. जाधव एस. एस. यांनी उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेच्या युगात ग्राहक जागरूक राहणे व वित्तीय साक्षरता आत्मसात करणे जीवन जगण्याच्या दृष्टीने फायदेशीर आहे या विषयी मार्गदर्शन केले. श्री. मनोज पवार (प्रकल्प अधिकारी, कंज्युमर फायनांशियल सोसायटी, मुंबई.) यांनी ग्राहकाची होणारी ऑन–लाईन खरेदीतील फसवणूक कशी टाळावी, ऑन–लाईन खरेदी करताना alibaba, Amazon.com and eBay इत्यादी वेब–साईटचा वापर करावा व खरेदीत फसवणूक झाल्यास कंज्युमर कोर्ट, १८००२२२२६२ आणि mah.helpline@gmai.com इत्यादीकडे तक्रार करण्याबाबत मार्गदर्शन केले. श्री. सुयश कामत (सर्टीफाईड फायनान्सियल प्लॅनर) गुंतवणूक, कर धोरणातील बदल, कर कायदे, भांडवल बाजार, शेअर्स बाजार, वास्तव संपत्ती बाजार व नवीन वस्तूबद्दल माहिती याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. ए. एन. दडस IQAC को– ऑर्डिनेटर यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कार्यशाळेचा बी. कॉम भाग ३ वर्गातील ८६ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.



'महिला सबलीकरण व सुरक्षितता' कार्यशाळा मार्गदर्शक मा. प्रवीण पाटील, ए.पी.आय. दहिवडी पोलीस स्टेशन

## महिला सबलीकरण व सुरक्षितता कार्यशाळा

०५/०१/२०१९ रोजी 'महिला सबलीकरण आणि सुरक्षितता' या व्याख्यानात मा. प्रवीण पाटील API, दहिवडी पोलीस स्टेशन यांनी पोक्सो कायद्याविषयी मार्गदर्शन केले. पोक्सो कायदा २०१२ नुसार लहान मुले व मुली या दोहोंना देण्यात आलेले संरक्षण, लहान मुले व मुली यांच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्यावर व लैंगिक अत्याचार करणाऱ्याची माहिती असून न सांगणाऱ्या व्यक्तीवर दाखल होणारा गुन्हा, महाविद्यालयातील तरुण मुलींनी पळून जाऊन लग्न केल्यानंतर कुटुंबाची होणारी वाईट परिस्थिती व प्रेम करणाऱ्या जोडीदाराचे होणारे हाल, आई- वडील, भाऊ- बहीण व इतर जवळच्यांचे प्रेम संपुष्टात येणे, याबद्दल मार्गदर्शन केले. महाविद्यालय तरुणींनी प्रथम आपले ध्येय प्राप्त करावे याबद्दल उपयुक्त मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगत डॉ. बलवंत बी. एस. यांनी व आभार प्रा. म्हेत्रे एन. एम. यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचा बी कॉम भाग ३ च्या १०३ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.



बँकिंग क्षेत्रातील करियर संधी - मार्गदर्शक डॉ. कुंभार व्ही. एम.

## बँकिंग क्षेत्रातील करियर संधी

०७/०१/२०१९ रोजी **बँकिंग क्षेत्रातील करियर संधी** या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. प्रा. डॉ. कुंभार व्ही. एम. समन्वयक आय. बी. पी. एस. केंद्र, डी जी कॉलेज, सातारा यांनी मार्गदर्शन केले. डॉ. राऊत के. एस. यांनी गट चर्चेच्या माध्यमातून विद्यार्थी व विद्यार्थिनीत व्यक्तिमत्व विकास, बौद्धिक क्षमता, नवनिर्माण क्षमता आणि निर्णय क्षमता वाढतात याविषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगतात मा. प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थी व विद्यार्थीनींना बँकिंग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात असणाऱ्या नोकरीच्या संधी उपलब्धतेबाबत मार्गदर्शन केले. बी.कॉम भाग २ व ३ या वर्गातील १५८ विद्यार्थ्यांनी कार्यशाळेचा लाभ घेतला.



सुश्री. जयश्री गोसावी परफ्यूम तयार करण्याचे प्रात्यक्षिक करताना

## परफ्यूम मेकिंग प्रशिक्षण - एकदिवसीय कार्यशाळा

०८/०२/२०१९ रोजी विद्यार्थ्यांसाठी 'उद्योजकता व स्वावलंबन' याविषयी माणदेशी फौंडेशन मार्फत 'परफ्यूम मेकिंग प्रशिक्षण एकदिवसीय कार्यशाळा' संपन्न झाली. मार्गदर्शक मा. जयश्री गोसावी यांनी मुलींना स्वत:च्या पायावर उभे रहावे; कमी खर्चात कसा जास्तीत जास्त नफा कमवता येईल, याविषयी मार्गदर्शन करत परफ्यूम तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. यात बी.कॉम भाग १ वर्गातील ५० विद्यार्थिनींनी लाभ घेतला.



'ट्रेड फेअर' उद्घाटक - मा.प्रवीण पाटील, ए.पी.आय.दहिवडी पोलिस स्टेशन

## ट्रेड फेअर

१३/०२/२०१९ रोजी बी.कॉम भाग ३ च्या विद्यार्थ्यांसाठी 'ट्रेड फेअर' चे आयोजन करण्यात आले. त्याचे उद्घाटन सहायक पोलीस निरीक्षक मा.प्रवीण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. बी.टी. जाधव, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष नंदकुमार खोत, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य सुनील पोळ, उद्योजक किसन सावंत आदी मान्यवर उपस्थित होते. व्होकेशनलच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या आवारात सेंद्रिय पद्धतीने पिकवलेली काकडी या ट्रेड फेअरचे आकर्षण ठरली. भेळ, मिसळ, पाणीपुरी, मिल्क शेक, बिर्याणी, दाबेली, वडापाव, लिंबू सरबत, आईस्क्रीम, लस्सी, मंचुरियन आदी पदार्थावर ताव मारण्यासाठी विद्यार्थ्यांची झुंबड उडाली होती. १३ विविध स्टॉल मधून १५० विद्यार्थी सहभागी झाले. प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, 'अशा उपक्रमामधूनच भावी उद्योजक घडतील. विद्यार्थी नोकरीवर विसंबून न राहता उद्योगधंद्याकडे वळतील'.



'वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व' एकदिवसीय कार्यशाळा - उद्‌घाटक मा. भुजंगराव बोबडे व मान्यवर

## इतिहास विभाग

०७/१२/२०१८ रोजी वस्तु संग्रहालय कोर्सचे उद्‌घाटक मा. भुजंगराव बोबडे (गांधी रिसर्च फाँडेशन जळगाव) यांनी वस्तुसंग्रहालयाविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी मा. रावसाहेब देशमुख (बिदाल) प्राचार्य डॉ. बी.टी. जाधव प्राध्यापक व विद्यार्थी हजर होते. ०९/०२/२०१९ रोजी पर्यटनाच्या दृष्टीने वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. उद्‌घाटक मा. विक्रमसिंह पाटील यांनी शस्त्रांस्त्रांची माहिती यावर मार्गदर्शन केले. मा. रावसाहेब देशमुखांनी स्थानिक 'इतिहास व पर्यटन' या विषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य बी.टी.जाधव होते. कार्यक्रमात इतिहास विभागातील प्राध्यापक विद्यार्थी यांनी सहभाग घेतला.



विशेष श्रमसंस्कार शिबीर भांडवली - एल्.बी.एस. बंधारे आरक्षण बंधारे बांधताना स्वयंसेवक

## राष्ट्रीय सेवा योजना

राष्ट्रीय सेवा योजना मार्फत महास्वच्छता अभियान राबवण्यात आले. 'स्वच्छ दहिवडी सुंदर दहिवडी' अंतर्गत दहिवडी शहरातील प्लॉस्टिक गोळा करण्यात आले. ०३/१२/२०१८ रोजी दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. यावेळी मा. दादासाहेब कांबळे (प्रांत, माण-खटाव) हे प्रमुख पाहुणे होते. तहसिलदार मा. बाई माने, मुख्याधिकारी मा. कपिल जगताप हे उपस्थित होते. अस्थिभंग मुलांची शाळा दहिवडी येथील मुलांना खाऊ वाटप करण्यात आला. दिनांक ०८/०१/२०१९ ते १४/०१/२०१९ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रम संस्कार शिबीर मौजे भांडवली येथे घेण्यात आले. या शिबीरात ग्राम स्वच्छता, माती व पाणी परीक्षण एल.बी. एस. बंधारे, आरधन बंधारे बांधण्यात आले. २५/०१/२०१९ रोजी जागतिक मतदार दिनानिमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ३०/०१/२०१९ रोजी शहीद दिन साजरा करण्यात आला.



२६ जानेवारी, अर्थशास्त्र विभाग विद्यार्थी रिसर्च पेपर प्रेझेन्टेशन

## अर्थशास्त्र विभाग

०६/१२/२०१८ रोजी अविष्कार संशोधन पेपर स्पर्धेत १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सातारा जिल्ह्यातील बचत गट एक अभ्यास, जलव्यवस्थापन एक अभ्यास, माण तालुक्यातील शेततळी एक अभ्यास, सातारा जिल्ह्यातील आरोग्यविषयक सुविधांचा चिकित्सक अभ्यास इत्यादी विषयावर आपली पोस्टर सादर केली. प्रजासत्ताक दिनानिमित्त संशोधन भित्तीपत्रक स्पर्धेत विभागातील ३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांनी भारतीय बँकामधील अलीकडील प्रवाह, भारतीय बँकातील विलीनीकरणाची प्रक्रिया, ईबँकींग या विषयावर भित्तीपत्रके सादर केली. या स्पर्धेमध्ये कु. प्रतीक्षा रघुनाथ पवार हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. दि. २८ फेब्रुवारी २०१९ रोजी संशोधनपर भित्तिपत्रक स्पर्धेत ३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये निरनिराळ्या पिकाखालील क्षेत्राचा अभ्यास, सातारा जिल्ह्यातील दुग्ध सहकारी संस्थांचा अभ्यास, सातारा जिल्ह्यातील लोकसंख्येचा अभ्यास या विषयावर भित्तिपत्रके सादर केली.



प्रजास्ताक दिनी संगणक विभागाचे रिसर्च पेपर प्रेझेंटेशन पाहताना प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव

## संगणक विभाग



२८ फेब्रुवारी विज्ञान दिन या भित्तीपत्रकाचे प्रदर्शन

२६जानेवारी २०१९ प्रजासत्ताक दिनानिमित्त whats app sucide game Momo या भित्तिपत्रकाचे प्रदर्शन कु. कुंभार ऋतुजा शशिकांत हिने तर २८ फेब्रुवारी २०१९ विज्ञान दिनानिमित्त भित्तिपत्रकाचे प्रदर्शन कु. शिंदे मोनिका हिने Virtual Reality केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. बी.टी.जाधव यांनी निरीक्षण व मार्गदर्शन केले.



# राज्यशास्त्र विभाग



राज्यशास्त्र विभाग आयोजित मतदान साक्षरता रॅली

२५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिन अभिरूप मतदान –
उद्घाटक : सौ. बाई माने, श्री. दादासाहेब कांबळे

२५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त महाविद्यालयात अभिरूप मतदानाचे आयोजन करण्यात आले. संविधानदूत यांजनेअंतर्गत संविधानदूत विद्यार्थ्यांस प्राचार्य. डॉ. बी.टी.जाधव, प्रांताधिकारी माण खटाव श्री. दादासाहेब कांबळे, तहसिलदार सौ. बाई माने यांच्या हस्ते निवडपत्र देण्यात आली. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त दहिवडी शहरात मतदान साक्षरता रॅलीचे आयोजन करण्यात आले.

## बी.सी.ए. विभाग



एक दिवसीय राज्यस्तरीय सेमिनार 'न्यू ट्रेंड्स इन कॉम्पुटर सायन्स अँड आय टी व डीसीडी क्येस्ट २०१९' –
उद्घाटक प्राचार्य डॉ. आर.जी.पवार

संगणकशास्त्र व बी सी ए विभागाने आयोजित केलेल्या एक दिवसीय राज्यस्तरीय सेमिनार 'न्यू ट्रेंड्स इन कॉम्पुटर सायन्स अँड आय टी व डीसीडी क्येस्ट २०१९' च्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. आर.जी.पवार यांनी, नवीन तंत्रज्ञान आणि नोकरीच्या उपलब्ध संधी याविषयी मार्गदर्शन केले यावेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.टी.जाधव उपस्थित होते. डीसीडी क्येस्ट २०१९ मध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. पेपर प्रेझेंटेशन ०५, पोस्टर प्रेझेंटेशन २२, प्रश्नमंजूषा २८ व प्रोग्रामिंग स्कील १२ संघ सातारा, सांगली व पुणे जिल्ह्यातून सहभागी झाले. यावेळी प्रा.ए.एच.कोळेकर, प्रा.एस.व्ही.कोळेकर, प्रा.व्ही.एस.रूपनवर, प्रा.कु.व्ही.व्ही.कणसे, प्रा.कु.एस.वाय.जगताप, प्रा.कु.के.एम.नांगरे, प्रा.कु.जे.टी.मोहिते, प्रा.कु.एस.एम.जाधव इ. उपस्थित होते.



डिसीडी क्येस्ट कॉम्पीटीशन – यशस्वी विद्यार्थी

'डेटा मायनिंग अ‍ॅन्ड डेटा वेअरहाऊसिंग ' २३/०१/२०१९ रोजी आयोजित केलेल्या कार्यशाळा उद्घाटनप्रसंगी डॉ. पी.पी. पाटील, यशवंतराव मोहिते इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कराड यांनी आजच्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये डेटा मायनिंग अ‍ॅन्ड डेटा वेअरहाऊसिंग या विषयाचे महत्त्व स्पष्ट केले. प्रा. लामकाने एस.एस.मुधोजी कॉलेज फलटण यांनी डेटा मायनिंग अ‍ॅन्ड डेटा वेअरहाऊसिंग मध्ये असणारे वेगवेगळे अल्गोरीथम आणि टेकनिक या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विभागप्रमुख प्रा. कोळेकर ए.एच. यांनी आभार व्यक्त केले. या कार्यशाळेमध्ये बी.सी.ए. भाग-३ मधील विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग घेतला.

## वांड्मय मंडळ



'मराठी राजभाषा दिन' – मार्गदर्शक श्रीमती केराबाई सरगर
रेडिओ जॉकी, माणदेश तरंग वाहिनी

वाड्.मय मंडळाने आयोजित केलेल्या प्रमाण लेखन, सुंदर लेखन स्पर्धेत ५८ विद्यार्थी सहभागी झाले. कविता वाचन स्पर्धेत १८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी शिक्षकांनी कविता सादर केल्या यावेळी डॉ. देवानंद सोनटक्के यांनी 'कविता सादर करण्याची कला' याविषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगत उपप्राचार्य डॉ. बलवंत यांनी व्यक्त केले. मराठी राजभाषा दिन प्रसंगी माणदेश तरंग वाहिनीच्या रेडिओ जॉकी श्रीमती केराबाई सरगर यांनी अनुभव कथन, मार्गदर्शन व माणदेशी कविता सादर केल्या.

## हिंदी विभाग



'समाचार लेखन व साक्षात्कार कला' लघुकालीन अभ्यासक्रमासाठीची भेट दै. लोकमंथन कार्यालय, सातारा



अंध – अपंग शाळा दहिवडी येथे खाऊ वाटप करताना विद्यार्थी

प्रजासत्ताक दिनी बी.ए. भाग २ च्या विद्यार्थ्यांनी व विज्ञान दिनी बी.ए. भाग. १ च्या विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेझेंटेशन केले. 'समाचार लेखन व साक्षात्कार कला' हा लघुकालीन अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला. या संबंधीची अभ्यास सहल शासकीय मुद्रणालय वाई, मराठी विश्वकोश कार्यालय, 'पुस्तकांचे गाव – भिलार' व दै. लोकमंथन कार्यालय, सातारा च्या प्रात्यक्षिक अनुभवाने संपन्न झाली. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी भाषा सर्वेक्षण प्रकल्प पूर्ण केला व दहिवडी येथील अंध–अपंग शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांना अध्यापन करुन खाऊ वाटप केले. प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव व विभाग प्रमुख उपप्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## Department of Microbiology



**Students of B.Sc. II**
**Presenting Postcrson the occasion of Republic Day**




**Students of B.Sc. - I**
**presenting posters on the occasion of Science Day.**

On the occasion of Republic Day Dahiwadi College, Dahiwadi arranges poster presentation programme. All Departments were participated in the poster presentation. At 8.00 am there was flag hoisting programme and 10.00 am onwards there was poster presentation. Students of B.Sc. - II were participated in this poster presentation.

## Department of Zoology



**Vermiculture and Sericulture one day workshop**
**Chief Gues Mr. Sunil Jadhav**



**Visit to Maharashtra Government Goat and Sheep Development Project, Dahiwadi of B.Sc. - III zoology students on 09/03/2019**

Department of Zoology organizes Guest Lecture of Astronomer Dr. Vishal Kumbhare on Scope of Life Science in Astronomy. Excursion Tour to Visit to Birds of Pingali Dam of B.Sc. - III zoology students on 09/03/2019.

One day workshop on Vermiculture and Sericulture was organized by Department of Zoology and B.Voc. Agri. On 29/01/2019. The chief Guest for the workshop was Mr. Sunil Jadhav and Resource Persons are Mr. Sharad Bhoite, Mr. Nikhil Chaudhary and Prin. Dr. B. T. Jadhav worked as President for the workshop.



## Department of Botany

One Day University level workshop on 'Recent Trends in Biotechnology' Prof. R. K. Sakhare, S.R. College Khatav has inauguarated Recent Trends in Biotechnology programme on 18th January 2019 Prof. G. B. Pawar & Prof. P. S. Phalake, Dept. of Botany, Balwant College, Vita has worked resource presons in presence of Hon. Prin. Dr. B. T. Jadhav Excursion was arranged on 23rd & 24th January, 2019 at Sericulture centre Wai, Wheat research centre Mahabaleshwar Konkan Krishi vidyapeeth Dapoli, Harane Bandar, Raigad Port. All B.Sc. II & B.Sc. III Botany students have enjoyed the study tour.

B.Sc. II Botany students has enthusiastically participated in **Wall Paper Presentation** entitled 'Medicinal Plants and RET plants in our college garden. White grub of Sugarcane, Brinjal Fruit Borer, Herbal Hair dye' on 26th January 2019. B.Sc. II, Botany (Plant Protection) students has enthusiastically participated in **Exhibition of Importance of Weeds & Insects'** on 20th February.

B.Sc. I, Botany students has enthusiastically participated in Research Paper presentation entitled 'Screening of Excoecuria agallocha L. for Chemical Potential, Study of Physicochemical Characteristics of Pingali Lake, of Man Tahsil. A comparative study of the different parts of Acacia arabica (Desi Babool & Prosopis Julifera (Vedi Babool) on 28th February 2019.



## Department of Chemistry

Department of chemistry of Dahiwadi College, Dahiwadi and S. M. Joshi College Hadapsar, Pune jointly organized two days International Conference on 'Advances in Chemical Science' on 18th and 19th December 2018 at S.M. Joshi College, Hadapsar. This international conference was inaugrated by auspicious hands of Hon. Prof. Dr. Manikrao Salunkhe (Vice Chancellor, Bharti Vidyapeeth Deemed university, Pune), hon. Prof. Dr. Nikos Hadgichristidis Kaust (Saudi Arabia) and Hon. Dr. P. P. Wadagaonkar (Senior Scientist NCL, Pune), Hon. Principal Dr. Bhausaheb Karale (Secretary, Rayat Shikshan Sanstha, Satara) and Hon. Principal Dr. B. T. Jadhav has chaired the inaugural function.

Planetary lectures were delivered by Hon. Prof. Dr. Domnique Hourdet ESPC Paris France, Hon. Dr. Satish A. Patil (Indian Institute of Science, Bengalaru), Dr. omkar Singh (Kushwaha, IIT Madras, Chennai, India), Dr. Bapurao B. Shingate (Babasaheb Marathwada, Aurangabad, Prof. Dr. Gajanan Rashlnkar (Shivaji University, Kolhapur), Dr. H. A. Parbat (Navi Mumbai), Hon. Dr. Sunil Lonkar they explained contemporary topics on Advances in Chemical Science. During two days conference oral & poster presentation were organized and research scholars presented their papers. Response to this activity was overwhelming.

Dahiwadi College Dahiwadi conducted the water analysis programme under the lead college scheme sponsored by Shivaji Unversity, Kolhapur. In this activity NSS students were asked to collect the different samples of water from the nearby area (Bhandawali). 12 samples were analyzed on 14/1/2019, Dr. A. U. Chopade, Dr. S. M. Khetre and B.Sc. III Chemistry students involved in the analysis. Prin. Dr. B. T. Jadhav Guided, motivated and inspired for organization of such kind of extension activity.

Department of Chemistry & IQAC has organized 'One Day State Level wokshop on **"Intellectual Property Rights"** . Hon. Gorakh Taware Chief Guest (Shahu Highschool Baramati) was the chief guest and he delivered key note address of the function. He emphasized on need and importance of the **Intellectual Property Rights** PG students & all teachers. Hon. Principal Dr. B. T. Jadhav presided over the function and he was the chairperson for the function. He welcomed the Hon. Gorakh Taware and Dr. Ankita Nagarkar, Pune. Hon. Principal Dr. B. T. Jadhav also inspired the students by sharing the experience and about patent file Dr. S. M. Khetre, Department of Chemistry & Dr. A. N. Dadas (IQAC Coordinator) all faculty members and PG students were present for this function Dr. A. U. Chopade Co-ordinator of the workshop proposed the vote of thanks.

## Department of Physics



**Live Session of Dr. Anand Deshpande on "Planning for Career, Future Trends"**



**"Avishkar Presentation" Examiner - Dr. A.P.Acharya**

In College Institution's Innovation Council and Innovation Lab was established under the guidance of Principal Dr. B. T. Jadhav. All programmes organized by Ministry of Human Resource Development are conducted in college by Department of Physics according to prescribed schedule. We arrange live session of India's Leadership Talk Series by Hon. Dr. Anand Mahindra, Hon. Ms. Shwetashree Majumdar, Hon. Dr. Anand Deshpande organized by Ministry of Human Resource. Also we organized idea competition for B.Sc. Students total 70 students participated in the competition. In Innovation Lab we collected ideas from students and send to Rayat Shikshan Sanstha. "Ramp for Disabled Person in S.T. Bus" was selected as best idea.

## शिक्षणशास्त्र विभाग



विद्यार्थ्यांच्या 'रिसर्च पोस्टर पुस्तक' अनावरण प्रसंगी मा.डॉ.शाळीग्राम एस.डी. अधिष्ठाता विज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

०३ जानेवारी २०१९ रोजी **IQAC** व अग्रणी कॉलेज आयोजित ''गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत '' 'शुध्दलेखन व हस्ताक्षर सुधार मार्गदर्शन कार्यशाळा'' महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात संपन्न झाली. कार्यशाळेसाठी परशुराम महादेव शिंदे कन्या विद्यालय, दहिवडी येथील कलाशिक्षक मा.श्री. शेख एस.एस. मार्गदर्शक होते.

११ फेब्रुवारी २०१९ रोजी **IQAC** आयोजित ''गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत'' शत्रुसंधो **(SWOT ANALYSIS)** विश्लेषण कार्यशाळा'' संपन्न झालेल्या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील शिक्षणशास्त्र विभागप्रमुख श्री.पाटोळे व्ही.एस. यांनी मार्गदर्शन केले.

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिन, २८ फेब्रुवारी विज्ञान दिन प्रसंगी महाविद्यालयात संशोधनपर पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. वर्षभरात एकूण ५४५ विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग नोंदवला. हा उपक्रम महाविद्यालयाचे उपक्रमशील मा.प्राचार्य बी.टी.जाधव यांच्या प्रेरणेमुळे यशस्वीरित्या राबविण्यात आला. सदर पोस्टरच्या आंतरविद्याशाखीय पुस्तकाचे अनावरण २ मार्च २०१९ रोजी महाविद्यालयात मा.डॉ.शाळीग्राम एस.डी.अधिष्ठाता विज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या हस्ते करण्यात आले.

## भूगोल विभाग



'Application of Remote Sensing and GIS in Disaster Management' कार्यशाळा उद्घाटक डॉ. एस. एस. पन्हाळकर शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभाग प्रमुख

भूगोल विभाग व शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. १२ जानेवारी रोजी 'Application of Remote Sensing and GIS in Disaster Management' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले. विविध महाविद्यालयातून एकूण २२० विद्यार्थी व २१ प्राध्यापक मिळून २४१ जणांनी नोंदणी केली. कार्यशाळेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. एस. पन्हाळकर यांचे हस्ते झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव साहेब उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमासाठी शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अभ्यास मंडळाचे चेअरमन डॉ. एस. डी. शिंदे, सदस्य डॉ. टी. पी. शिंदे, प्रा.अभिजीत पाटील हे उपस्थित होते.

'भूगोल दिन' या कार्यक्रसाठी प्रमुख पाहुणे डॉ. पी. आर. तळेकर, संत गाडगे महाराज कॉलेज, कराड हे उपस्थित होते. त्यांनी भूगोलाचे बदलते स्वरूप या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच **पर्यटन** या शॉर्टटर्म कोर्स साठी 'भारतातील पर्यटनाच्या संधी' या विषयावर त्यांचे गेस्ट लेक्चर झाले.

## पर्यावरण अभ्यास



'Green Audit Commitee' कार्यशाळा उद्घाटक डॉ. बी. एल. चव्हाण डॉ.बा.आं.म. विद्यापीठ औरंगाबाद अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव

## मराठी विभाग



"Grammar Consultancy" मार्गदर्शक - विद्यार्थी शिक्षक व डॉ.देवानंद सोनटक्के, डॉ. सुलोचना वाघमोडे

मराठी विभागाच्या वतीने १९ जाने, २०१९ रोजी प.म.शिंदे कन्या विद्यालय दहिवडी येथे "Marathi Grammar Free Consultancy" हा उपक्रम इयत्ता ५,६,७,८,९ आणि १० च्या ६७५ विद्यार्थ्यांना व्याकरणातील घटकांचे कृती, प्रश्न आणि सहभाग पध्दतीने अध्यापन करण्यात आले. अध्यापनासाठी बी.ए.१ व ३ या वर्गातील एकूण २३ विद्यार्थ्यांचे उद्बोधन करून शिक्षण म्हणून निवड करण्यात आली.

## जिमखाना विभाग

२/१/२०१९ रोजी सातारा झोनल बेसबॉल (मुले) स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचा संघ प्रथम क्रमांकाने विजयी झाला. कर्मवीर क्रीडा प्रबोधिनी वर्धापन दिन ९/१/२०१९ रोजी साजरा करण्यात आला. उद्घाटक मा. प्रा. अरुण घोडके, इस्लामपूर हे होते. हॉलीबॉल, हँडबॉल स्पर्धेमध्ये ज्यू. कॉलेज, सि. कॉलेज, महात्मा गांधी विद्यालय, कन्या विद्यालय, रयत इंग्लिश मिडियम स्कूल मधील मुले, मुली यांनी सहभाग घेतला. स्पर्धेअंती दहिवडी संकुलातील शाखामधून राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केलेल्या खेळाडूंचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. २१/१/२०१९ ते २५/१/२०१९ या कालावधीत कर्मवीर विद्या प्रबोधिनी, जिमखाना विभाग व अग्रणी कॉलेज अंतर्गत पाच दिवसाचे क्रिकेट, हँडबॉल, बॅडमिंडन व टेबलटेनिस या खेळांसाठी मुले व मुली यांचे शिबीर आयोजित करण्यात आले. सदर शिबिरास दहिवडी मधील सर्व शाखांमधील ११० खेळाडू सहभागी झाले होते. सदर शिबिरास श्री. कान्हेरे चंद्रकांत लक्ष्मण –बॅडमिंटन, श्री. दत्तात्रय बाबुराव अवघडे– हँडबॉल, प्रा. गवाळे निनाद– टेबल टेनिस प्रा. जाधव अमीर– क्रिकेट असे मार्गदर्शक होते. प्रजासत्ताक दिनानिमित्त मा. प्राचार्य डॉ. बी.टी. जाधव यांचे हस्ते ध्वजारोहन कार्यक्रम साजरा झाला.१४/२/२०१९ रोजी वार्षिक पारितोषिक समारंभ घेण्यात आला. प्रमुख पाहुणे–मा. संतोष पाटील (अभिनेते) मा. भाग्यश्री बिले (राष्ट्रीय खेळाडू, जिल्हा क्रीडा अधिकारी, भंडारा) मा. महादेव कासगावडे – बिले (जिल्हा क्रीडा अधिकारी, भंडारा) प्रमुख मार्गदर्शक मा. सौ. अनुराधा देशमुख अध्यक्षस्थानी मा. डॉ. चंद्रकांत खिलारे (प्राचार्य, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर, प्राचार्य डॉ. बी.टी.जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

# जिमखाना विभाग वार्षिक पारितोषिक वितरण व विविध स्पर्धा क्षणचित्रे
























**संपादक** - डॉ. के.एम.पवार

**सदस्य** - श्री.व्ही.एस.पाटोळे

श्री. एस.आर. धोगंडे

कु. ए.आर.हुलवान

श्री. एन.एम.म्हेत्रे